MHAH170025982025

**नियमित दिवाणी दावा क्र.३३५/२०२५**

नवनाथ मुरलीधर खर्डे व इतर

**विरुद्ध**

भास्कर मुरलीधर खडे व इतर

**निशाणी क्र. ०५ खालील आदेश**

०१. वादींनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रीया संहिताचे आदेश २६ नियम ९ अन्वये उभय पक्षकारांच्या मिळकतींची संयुक्त मोजणीकामी टीआयएलआर यांची नेमणूक कोर्ट कमिशनर म्हणून करणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र. १ ते १२ यांना दाव्याचे समन्स लागू होऊनही ते प्रकरणात हजर झाले नाहीत अथवा त्यांनी दाव्याला किंवा प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले नाही. म्हणून दावा सर्व प्रतिवादींविरुध्द एकतर्फा चाललेला आहे.

०३. वादींच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा मोजणी होऊन मिळण्यासाठी व अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील कथनांवरुन असे दिसून येते की, उभय पक्षकारांमध्ये त्यांच्या शेत-जमिनींच्या बांधहद्दी संबंधी वाद आहेत. कोर्ट कमिशनरद्वारे दावा मिळकतींची मोजणी होऊन मिळण्याची मागणी वादींनी मुळ दाव्यातच करुन दावा दाखल करतानाच प्रस्तुतचा स्वतंत्र अर्ज देखील त्याकरीता दाखल केलेला आहे. सर्व प्रतिवादींना दाव्याचे समन्स लागू होऊनही ते प्रकरणात हजर झाले नाहीत अथवा त्यांनी दाव्याला किंवा प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले नाही वा आक्षेप नोंदवलेला नाही. दावा मिळकतींचे ७/१२ उतारे वादींनी पटलावर दाखल करुन वादी क्र. १ याने त्याचा साक्षीपुरावा नोंदवून प्रतिवादींनी त्यांच्या क्षेत्रावर केलेल्या अतिक्रमणाबाबत तक्रारी उपस्थित केलेल्या आहेत. त्यामुळे, या अर्जातील मागणी दाव्याच्या या टप्प्यात मान्य झाल्यास त्याद्वारे वादींनी पुरावा गोळा केल्यासारखे होणार नाही. दाव्याचे स्वरुप व वादींनी केलेल्या मागण्या पाहता उभय पक्षकारांच्या मिळकतींची वस्तुस्थिती पटलावर येणे

गरजेचे ठरते. त्याकरीता, जाय-मोक्यावरील वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतींची स्थळपाहणी, मोजणी व हद्द निश्चिती शासकीय मोजणीदार यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करुन त्यांच्याद्वारे मोजणी करुन नकाशाद्वारे केल्यास सदर मिळकतींसंदर्भातील सत्य परिस्थिती पटलावर येण्यास व दाव्याचा अंतिम न्यायनिवाडा करण्यास मदत होईल. तसेच, उभय पक्षकारांतील वाद द्विगुणीत होणार नाहीत. तशी संयुक्त मोजणी झाल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर मोजणीचा व कोर्ट कमिशनरचा खर्च वादी स्वत: भागवणार असल्याचे वादींच्या विधीज्ञांनी युक्तीवादादरम्यान कथन केले आहे. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :-

## आदेश

अ) प्रस्तुतचा अर्ज (नि.क्र.०५) हा मंजूर करणेत येतो.

ब) दिवाणी प्रक्रिया संहिता चे आदेश २६ नियम ९ अन्वये उप-अधिक्षक, भूमि अभिलेख, राहाता यांची याकामी कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करणेत येते.

क) कोर्ट कमिशनर यांनी मौजे भगवतीपुर, ता. राहाता येथील या दाव्याच्या पॅरा क्र. १अ मधील मिळकत गट क्र. १३९/२, तसेच दाव्याच्या पॅरा क्र. १ब मधील मिळकत गट क्र. १३८/२ या वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतींची आणि प्रतिवादी क्र. १ ची गट क्र. १४३ या मिळकतींची संयुक्त मोजणी करुन नकाशाद्वारे बांध-हद्दी निश्चित करुन त्या मिळकतींमध्ये अतिक्रमण असल्यास, कोणाचे, कोणत्या बाजुने व किती क्षेत्रावर, याबद्दलचा वस्तुस्थिती दर्शक सविस्तर व स्वयंस्पष्ट अहवाल मोजणी नकाशासह लवकरात लवकर सादर करावा.

ड) कोर्ट कमिशनर यांचे शुल्क हे अर्जदार म्हणजेच वादींनी संबंधित कार्यालयात नियमाप्रमाणे भरणा/जमा करावे.

इ) वादींनी सदर कोर्ट कमिशनरच्या कामकाजाकरीता आवश्यक ती सर्व कागदपत्रे व माहिती कोर्ट कमिशनर यांना सादर करावी.

ई) येणेप्रमाणे कमिशन रिट पाठविणेत यावे.

SACHIN SHRIRAM TAT
Digitally signed by SACHIN SHRIRAM TAT
Date: 2026.06.11 17:51:22 +0530

ठिकाण : राहाता. (सचिन श्रीराम तट)
तारीख : ११/०६/२०२६ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, राहाता,
जि. अहमदनगर.